# <u>परमपूज्य काकामहाराज यांच्याशी पुणे येथे झालेली चर्चा</u>
# <u>१४ फेब्रुवारी २००९</u>

*१४ फेब्रुवारी २००९ रोजी परमपूज्य काकामहाराज (गुरुदेव) या 'सेल्फ अवेकनिंग' न्यूजलेटरचे संपादक श्री दिलीप कामत, यांच्याबरोबर बसले होते. त्यांच्या आयुष्यातील अनुभवांबद्धल सविस्तर चर्चा करावी, महायोगाच्या मर्मज्ञानाविषयी काही बोलावे आणि त्यातूनच साधकांना काही उपदेश करावा असा मानस होता. या चर्चेचा संपादित भाग खालील परिच्छेदात दिला आहे. ही चर्चा प्रसिद्ध करण्याचे एकमेव कारण हे आहे की गुरुदेवांचे अनुभव आणि ते प्रचार करीत असलेल्या महायोगांतर्गतचे यथार्थ ज्ञान साधकांना प्राप्त व्हावे. त्यातून स्फूर्ती मिळून या महायोगमार्ग अनुसरण्याचा त्यांनी कसोशीने प्रयत्न करीत राहावा.*

*प.पू. **काकामहाराजांबरोबर झालेली ही चर्चा सेल्फ अवेकनिंग न्यूजलेटरच्या मे २००९च्या अंकात प्रथम प्रकाशित झाली होती. ही अभिलेखित केली आहे*** *(अर्काइव्हड अॅट http://mahayoga.org/newsletter/Self%20Awakening%20Vol%201%20Issue%204.pdf)*

संपादक - महाराज, या ई - न्यूजलेटरसाठी आपली मुलाखत घेण्याची संधी आपण मला दिलीत त्यासाठी प्रथम धन्यवाद. हे न्यूजलेटर वाचणाऱ्या साधकांना याचा नक्कीच उपयोग होईल. सुरुवात करायची का?

गुरुदेव - हो, आपण सुरु करूया.

संपादक - गुरुदेव, आपणास महायोगाबद्दल एव्हढे प्रेम का वाटते? कशामुळे तुम्ही महायोगाकडे आकर्षित झालात?

गुरुदेव- अगदी लहानपणापासूनच मला "योगी" बनण्याची इच्छा होती. का माहीत नाही पण योगीच बनावे असे मनात होते. लहानपणी पाहिलेल्या काही चित्रपटांमुळे ह्या इच्छेला बळकटी आली वा ती अधिक प्रबळ झाली. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम व तत्सम काही चित्रपट मी पहिले. त्या चित्रपटामुळे माझी वृत्ती अशी झाली की मी सतत "विठ्ठल विठ्ठल"

गुणगुणत असे. कुठेही रिकामा बसलो की मनात विठ्ठलनामाचे गुणगुणणे चालू असायचे. काही वेळा मी ज्ञानेश्वरांची वचने व ओव्या पाठ करून म्हणत असे.

संपादक - आपणास काय वाटते, हे असे कशामुळे होत असावे?

गुरुदेव - मला माहीत नाही की काय माझ्या आत होते, ज्याने मला हे करायला लावले. परंतु माझ्या आत एक प्रकारची शक्ती कार्यरत होती, जिच्यामुळे या विशिष्ट शास्त्राकडे मी ओढला गेलो. माझे मित्र आणि इतर विद्यार्थीही तिथे होते परंतु मला समजत नाही की मी एकट्यानेच योगात रुची का दाखवली. कदाचित हे माझे प्रारब्ध असेल. त्यामुळे मला योगामध्ये रुची का निर्माण झाली याचे उत्तर माझ्याकडे नाही. तुम्हाला याचे उत्तर देणे माझ्या शक्तीपलिकडचे आहे. याचे श्रेय मी फक्त प्रारब्धाला देईन.

संपादक - कधीतरी नंतर परमपूज्य लोकनाथतीर्थ महाराज तुम्हाला भेटले. ते कसे घडून आले?

गुरुदेव - मी वयाने बराच मोठा झाल्यावर ते झाले. जेव्हा मी १० ते १५ वर्षांचा होतो तेव्हा मला योगात रुची वाटू लागली. मला गाण्याचाही नाद होता. गायनात मी बक्षिसेसुद्धा मिळवली होती. माझा आवाज फार चांगला होता आणि मी चांगला गाऊ शकत असे. त्यामुळे गायन व पाठांतर स्पर्धेमध्ये मी नेहमीच पहिला येत असे. माझी मुंज झाल्यानंतर मी गायत्री मंत्राचा जप सुरु केला आणि साधारण मी मॅट्रीकला असताना योगामधील माझी आवड अधिकच तीव्र झाली. परंतु मी माझ्या शाळेतील अभ्यासाकडे दुर्लक्ष केले नाही. मला दोन्ही गोष्टी आवडायच्या, अभ्यासपण आणि योग पण.

संपादक - मग तुमच्या कॉलेजच्या दिवसांचे काय?

गुरुदेव - माझ्या कॉलेजच्या दिवसात मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात जाऊ लागलो. त्यामुळे माझ्या जीवनातील एका सुंदर पर्वाला सुरुवात झाली. मला एका परिषदेचा मुख्य बनविले गेले, ज्यात साधारण १००,००० सभासद

होते. इंटर सायन्सनंतर मी इंजिनीअरिंग कॉलेजला जाऊ लागलो. पण मी पहिल्या वर्षी काही प्रगती केली नाही. मी बी एस सी व ईजिनिअरिंग दोन्ही करत होतो. परिणामी त्या वर्षी माझ्या अभ्यासात मुळीच प्रगती झाली नाही. त्यात भर म्हणून मी संघात होतो व संघाचा खंदा कार्यकर्ता होतो म्हणून सरकारने मला पकडले व तुरुंगात टाकले. तेव्हा 'संघाचा सत्याग्रह' चालू होता. माझ्या बॅरॅकमध्ये ३०० विद्यार्थी होते, ज्यात संघाचे आयोजक व साधक होते. अशा उपक्रमात मला भगवदगीता गाण्यासाठी नेतृत्व करण्याचा अधिकार दिला होता आणि अशाच एका प्रसंगी मला अटक करण्यात आली. मला कॉलेजमध्ये हजर राहण्यासाठी पॅरोल दिला नाही, कारण मी सत्याग्रही नेत्यांपैकी एक होतो. तीन महिने मी तुरुंगात होतो.

संपादक - तुमच्यासाठी ते फार कठीण गेले असेल ना?

गुरुदेव - हो. मला कॉलेजातील लेक्चर्सला जाता न आल्यामुळे मला तुरुंगात अभ्यास करावा लागला. सरकारने परीक्षेला बसण्यासाठी मला पॅरोल दिला. परंतु त्या वर्षी माझा अभ्यास कमी पडला आणि ज्युनिअर बी.एस.सी पास होण्यासाठी लागणारे  कमीतकमी ४५% मार्कसुद्धा मला मिळाले नाहीत. मात्र त्याने माझी उमेद खचली नाही. पुढच्या वर्षी मी इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्षाला आणि सिनीअर बी.एस.सीला प्रवेश घेतला. त्याबरोबरच मला ज्युनिअर बी.एस.सीही पूर्ण करायचे होते. पर्यायाने अखेरीस माझ्या इंजिनिअरींगच्या शेवटच्या वर्षात बी. ई. आणि बी.एस.सी. दोन्ही पूर्ण झाले. १९५२ साली साधारण दोन आठवड्याच्या कालावधीत  मला दोन डिग्र्या प्राप्त झाल्या.

संपादक - ही तर फार मोठीच कामगिरी पार पाडली!

गुरुदेव - मी बी एस सीसाठी मुख्य विषय 'गणित' घेतला होता. गणितात ८ पेपर्स होते. त्यात खगोलशास्त्र व मीमांसा हे दोन मला फार आवडायचे. त्यामुळेच मला हे शक्य झाले.

संपादक - मग पुढे तुम्ही काय केलेत?

गुरूदेव - साधारण त्याच सुमारास रा. स्वयं. संघाने सिंहगड, पुरंदर सारख्या महाराष्ट्रातील गडांवर सायकलवरचे पर्यटन आयोजित केले होते. तेव्हा मी सुद्धा ५/ ६ गडांवर जाऊन आलो.
संपादक - हे सायकलने गड चढणे म्हणजे त्यावेळी तुमची प्रकृती उत्तम असली पाहिजे.
गुरूदेव - हो. त्या काळात मी दररोज योगासने करीत असे. तेव्हा मी पूर्ण मत्स्येन्द्रासनाचा  सराव पण करीत असे. विशेष असे की हे एक कठीण आसन आहे. आता माझ्यात शारिरिक क्षमता राहिली नाही, परंतु त्या काळात मी खूप सडपातळ होतो, त्यामुळे मी ते कठीण आसनही करू शकत असे.

साधारण त्याच वेळेस, १९५२मध्ये, कोणीतरी मला सांगितले कि तुला जर योगाची आवड असेल तर इथे जवळच एक साधुपुरूष आले आहेत, त्यांना भेटायला व नमस्कार करायला तुला कदाचित आवडेल.म्हणून मी त्या साधूंना भेटायला गेलो व त्यांच्या पाया पडलो. ते साधुपुरूष म्हणजे परमपूज्य लोकनाथतीर्थ स्वामीमहाराज होते. जेव्हा पाया पडून मी वर पहिले तेव्हा त्यांचे हिंदीतले  पहिले वाक्य होते, “तुला जर तुझ्या गुरुबद्धल आदर वाटत असेल तर तू साष्टांग दंडवत घालायला हवास.” लगेच मी साष्टांग दंडवत घातला व म्हणालो, “अर्थातच आपण माझे गुरू आहात.” तिथपासून माझी त्यांची रोज भेट होऊ लागली. त्या काळात योगासनांचा सराव करायला मला अधिक  आवडत असे.
संपादक - हे सगळे कुठे घडले? तुम्ही तेव्हा कोणत्या शहरात राहात होतात?
गुरूदेव - इथेच पुण्यामध्ये. खरे तर या वासुदेव निवासपासून अगदी जवळच. त्या वेळी जेव्हा मी प.पू. लोकनाथ तीर्थ महाराजांना भेटायला जायचो तेव्हा प.पू. गुळवणी महाराजही जवळपासच असायचे. मी जेव्हा

योगासनांचा सराव करायचो तेव्हा त्यांनी पाहिले की कठीण असलेले, पूर्ण मत्स्येन्द्रासनही मी करायचो.

संपादक - हो. प.पू. गुळवणी महाराजांनाही योगासनांमध्ये खूप रुची होती.

गुरूदेव - हो. त्यांना योगासने फार आवडायची आणि ते त्यात प्रवीण होते. अतिशय अवघड आसने करतानाचे त्यांचे काही प्रसिद्‌ध फोटोग्राफ्स आहेत. ज्यावेळी त्यांनी मला पूर्ण मत्स्येन्द्रासन करताना पाहिले, त्यावेळी ते माझ्याजवळ आले आणि मला म्हणाले, “ते आसन तू खूप छान व सुंदररीत्या करतोस.” १९५१च्या सुमारास श्री बाळासाहेब वाकडे तिथे होते. ते संघाचे पुढारी होते आणि ते मला योगासनांचा सराव करण्यास उद्‌युक्त करत. एक दिवस ते मला म्हणाले, “तू फक्त योगासने का करतोस? तू स्वामीजींना दीक्षा देण्यास सांग ना.” मी त्यांना म्हणालो, “दीक्षा म्हणजे काय?” मग श्री बाळासाहेबांनी मला दिक्षेबद्‌द्‌ल माहिती दिली आणि मी ठरविले कि स्वामीजींना दिक्षा देण्याबद्‌द्‌ल विचारण्याची कल्पना चांगली आहे. म्हणून मी स्वामीजींना गुरूवारी भेटायला गेलो आणि त्यांना विचारले की मला दीक्षा देणे त्यांना शक्य होईल का? स्वामीजींनी उत्तर दिले, “तू अजून विद्‌यार्थी आहेस आणि तुला तुझा अभ्यास करायचा आहे. या वेळेस दीक्षा देणे योग्य ठरणार नाही.” ते ऐकून मी निराश झालो. पुढच्या शनिवारी मी जेव्हा स्वामीजींना भेटावयास गेलो तेव्हा त्यांनी मला सांगितले , “उद्‌या तुला दीक्षा मिळेल.”

संपादक - हा तुमच्यासाठी सुखद आश्चर्याचा धक्काच असेल.

गुरूदेव - हो. आणखी कारण म्हणजे तो दिवस जेजुरीचा खंडोबा (जेजुरी गावातील भगवान शिवाचे एक रूप) ह्या माझ्या कुलदैवताचा होता. रविवार, आठवड्यातील याच वारी माझा जन्म झाला. त्यामुळे मला मी फार सुदैवी आहे असे वाटले.

संपादक - या दिवसाचे तुमच्या मनातील महत्व स्वामीजींना माहित होते का?

गुरूदेव - नाही तसे काही नाही. त्यांनी असेच ठरविले की हा दिवस असेल. एके दिवशी त्यांनी मला सांगितले कि तू अजून दीक्षेसाठी तयार नाहीस आणि दोन दिवसांनी त्यांनी जाहीर केले कि उद्‌या ते मला दीक्षा देणार आहेत! यामागे स्वामिजींचे काय गणित होते याची मला कल्पना नव्हती. त्यांनी मला दीक्षा देण्याचे ठरविले याचाच मला फार आनंद झाला होता आणि दुसऱ्या दिवशी सकाळी मी त्यांच्याकडे दीक्षा घेण्यासाठी गेलो. त्यांनी माझ्या डोक्यावर हात ठेवला आणि त्याच क्षणी दीक्षेची सुरूवात झाली. त्यानंतर मी दररोज स्वामीजींकडे जात असे व साधन करीत असे. ते फार प्रेमळ होते. माझी दीक्षा झाल्यानंतर स्वामीजींशी मोकळेपणे बोलू शकणाऱ्या (माझ्याप्रमाणे नाही, मला त्यांच्याबद्‌दल आदरयुक्त भीती वाटे) कोणी एकाने त्यांना विचारले, "तुम्ही नारायणला सांगितले कि, तुझी तयारी झालेली नाही आणि दोन दिवसांनी लगेच त्याला दीक्षा दिली". स्वामीजींनी उत्तर दिले, "त्यादिवशी मी त्याला नाही सांगितले आणि माझ्या साधनेला गतीच येईना. त्याचे व माझे परस्परांचे काही तरी देणे असावे, काही ऋणानुबंध असावा. म्हणून शक्तीमातेने मला सांगितले कि, त्याला दीक्षा दिली पाहिजे." मला वाटते हे प्रारब्धच होते.

संपादक - त्यानंतर स्वामिजींशी तुमचे संबंध कसे होते?

गुरूदेव - फार घनिष्ठ संबंध होते. ते पुण्यात असेपर्यंत मी त्यांना दररोज भेटायचो. जेव्हा त्यांनी पुणे सोडले व वाराणशीला राहायला गेले, त्यानंतरही ते फेब्रुवारी १९५५ मध्ये स्वर्गवासी होईपर्यंत मी त्यांच्याशी पत्रव्यवहाराद्‌वारे सतत संपर्कात होतो. स्वामीजींनी मला सांगितले होते कि नेहमी गुरूंचे स्मरण करावे. त्याप्रमाणे माझ्या हृदयात ते सतत असतात. त्यांच्या शुभाशीर्वादाबद्‌द्‌ल मी कृतज्ञ आहे. त्यांच्यामुळे माझे जीवन यशस्वी झाले व माझे आध्यात्मिक जीवनही सफल झाले. त्यांचे मार्गदर्शन व आशीर्वाद याशिवाय हे काहीच शक्य झाले नसते.

संपादक - मला कळले आहे कि तुम्ही माझे गुरूदेव, प.पू. गुळवणी महाराजांच्या फार निकटचे होतात.

गुरूदेव- फेब्रुवारी १९५५मध्ये स्वामीजी स्वर्गवासी झाले त्यानंतर प.पू. गुळवणी महाराजांच्या अगदी जवळच्या संपर्कात होतो.

संपादक - एका अर्थाने ते तुमचे गुरुबंधूच होते. स्वामीजी हे तुमचे व त्यांचे सामाईक गुरु होते.

गुरूदेव - हो. ते माझे गुरूबंधू होते, परंतु ते माझ्यापेक्षा ज्येष्ठ होते. एका अर्थी मी त्यांचा खूप खूप कनिष्ठ बंधू होतो, म्हणजे एक छोट्या दर्जाचा बंधू. प.पू. गुळवणी महाराजांनी १९७४ साली हे जग सोडले, तेव्हा प.पू. दत्तमहाराज कवीश्वर त्यांचे उत्तराधिकारी झाले व मी त्यांचे मार्गदर्शन घेऊ लागलो. प.पू. दत्तमहाराजांनी आध्यात्मिकदृष्ट्या माझी चांगलीच काळजी घेतली. कदाचित माझ्या मनात शुध्द हेतू आहे असे वाटल्याने, लहान मुलासारख्या कधीकधी करीत असलेल्या माझ्या खट्याळपणाकडे ते लक्ष देत नसावेत. १९७४ पासून ते १९९९ साली ते हे जग सोडून गेले तोपर्यंत सतत २५ वर्षे मला त्यांचे मार्गदर्शन लाभले. १९८५ मध्ये त्यांनी मला प.पू. गुळवणी महाराजांनी स्थापन केलेल्या पुणे येथील ट्रस्टमध्ये सामील होण्यास बोलाविले. तोपर्यंत मी महाराष्ट्र सरकारच्या नोकरीतून निवृत्त झालो होतो, म्हणून मी तयार झालो. मध्यंतरीच्या काळात मी सुद्धा नाशिक येथे प.पू. लोकनाथ तीर्थ महाराज ट्रस्ट स्थापन केला होता. त्यानुसार मी महाराष्ट्रात व भारतात अनेक ठिकाणी महायोगाचा प्रचार करण्यासाठी जाण्यास सुरुवात केली होती. जे साधक प. पू. गुळवणी महाराजांनी घालून दिलेल्या प्रस्थापित मूल्यांनुसार आचरण करण्यास तयार होते त्यांना मी दीक्षा देण्यास सुरुवात केली होती. १९९९ साली प.पू. दत्तमहाराज स्वर्गवासी झाल्यानंतर पुणे येथील आश्रमाच्या प्रमुख विश्वस्त पदाची जबाबदारी मी अनिच्छेनेच स्वीकारली.

संपादक - मग तेव्हापासून परिस्थिती कशी राहिली आहे?

गुरूदेव - परिस्थिती छानच आहे. तुम्हाला माहित आहे कि आम्ही हळूहळू महायोगाच्या संदेशाचा प्रसार करीत आहोत. बऱ्याच मोठ्या संख्येने आम्ही दीक्षा दिल्या आहेत आणि लोकांना त्यांच्या साधनेत दिव्य अनुभव येत

आहेत. भारतातील प्रसिद्ध कॉम्प्युटर शास्त्रज्ञ डॉ विजय भटकर यांच्याविषयी तुम्ही एकलेच असेल. त्यांनाही दीक्षा मिळाली आहे. एकदा ते इथे पुण्यात मला भेटायला आले होते आणि आम्ही अणू व पदार्थविज्ञान शास्त्र (फिजिक्स) यावर गप्पा मारल्या. मी त्यांना सांगितले कि आता आपल्याला ज्ञात असलेल्या लौकीकशास्त्राच्या ज्ञानापेक्षा हे महायोगाचे शास्त्र थोडे वेगळे आहे. महायोग अगदी साधा आहे. साधकाने या शास्त्राचे विश्लेषण करण्याची गरज नाही, त्याने फक्त अनुभव घ्यावा. हे अगदी सोपे आहे कारण अनुभव घेण्यासाठी त्याने काही न करता केवळ बसायचे आहे. ते म्हणाले, “खरंच?” मी म्हणालो, “हो”. मग मी त्यांना डोळे मिटून शांत बसायला सांगितले. ते तसे बसले आणि थोड्याच वेळात तंद्री लागल्याने ते पाठीमागे पडले. त्यानंतर मी त्यांना औपचारिक दीक्षा घेण्यासाठी तारीख दिली. परंतु दिलेल्या तारखेच्या आठ दिवस आधीच त्यांना आपोआप दीक्षा झाली. मी त्यांना म्हणालो, शक्तीमातेला घाई झाली असावी. अशा बऱ्याच प्रसंगी हे नेहमी घडते आणि मला अनेकदा आश्चर्य वाटते कि या गोष्टी कशा काय घडतात, एव्हढा शक्तीचा स्त्रोत कशामुळे येतो.

काही वर्षापूर्वी शिरशी मठाचे स्वामी शंकराचार्य त्यांच्या एका शिष्यासह मला भेटायला आले होते. आम्ही त्यांचे आश्रमात स्वागत केले, त्यांची पूजा वगैरे केली. ते म्हणाले त्यांना माझ्याशी कोणत्यातरी गोष्टीबद्दल बोलायचे आहे. मी म्हटले बरे, मला त्यांचे बोलणे ऐकायला आवडेल. ते म्हणाले कि त्यांना माझ्याकडून दीक्षा हवी आहे. मी त्यांना म्हणालो, “हे कसे शक्य आहे. आपण शंकराचार्य आहात, त्यामुळे आम्ही तुम्हाला खुद्द श्री दत्तगुरूच मानतो. मग मी आपणास दीक्षा कशी काय देऊ शकेन? ही गोष्ट करण्यास आपण मला का सांगता? आपणास दीक्षा देणे मला शक्य नाही.” पण नंतर मी त्यांना म्हणालो की, “आमच्याकडे दीक्षा मिळण्यासाठी निवेदन पत्र आहे. ते त्यांनी सही करून द्यावे आणि मी ते पत्र स्वामिजींच्या (प.पू.लोकनाथ तीर्थ स्वामी महाराजांच्या) फोटोसमोर

ठेवीन. मग जे काही असेल ते स्वमिजींच्यात व तुमच्यात होईल. दीक्षा मिळेल अथवा न मिळेल, हे काही माझ्या हातात नाही." मी सुचविल्याप्रमाणे शंकराचार्यांनी केले आणि पहा तरी, त्यांना दीक्षेचा लाभ झाला. ते वेगळा योगमार्ग (संप्रदाय) अनुसरत असल्याने त्यांना काही वेगळे अनुभव आले. त्यानंतर दुसऱ्या दोन शंकराचार्यांनी दीक्षेसाठी विनंती केली आणि त्यांनाही अशीच दीक्षा मिळाली.

संपादक - तेव्हा असे दिसते कि महायोगाचा प्रचार अगदी छान चालला आहे.

गुरूदेव - हो, अगदी छान चालू आहे. काही दिवसांपूर्वी आम्ही ठरविले होते कि भारतात चार वेगवेगळ्या स्थानांवर चार केंद्रे स्थापित करायची - पवित्र काशी (वाराणशी) शहरात, रामेश्वरमला, जिथे स्वामीजींनी दक्षिण भारतात महायोगाचा प्रचार करण्यास पाठविले होते, आंध्रप्रदेश राज्यात पिठापूर येथे, जे श्री दत्तगुरूंच्या भक्तांसाठी एक पवित्र स्थान आहे, श्री दत्तगुरूंचे अवतार श्रीपाद श्रीवल्लभांचे जन्मस्थान आहे आणि शेवटी नरसोबाची वाडी (हिला वाडी असे पण म्हणतात). श्री नृसिंह सरस्वती (ज्यांना श्री दत्तगुरूंचे दुसरे अवतार मानले जाते) यांनी आणि श्री वासुदेवानंद सरस्वती (प.पू. श्री टेंबे स्वामी महाराज) यांनी हे स्थान पवित्र / पापमुक्त केले आहे. आमचा असा मानस आहे कि या प्रत्येक स्थळी दोन सप्ताह आयोजित करायचे (दोन आठवड्यांचा उत्कट/ तीव्र आध्यात्मिक उपक्रम). यात साधकांना व इतरांना महायोगाच्या सम्बन्धित कार्यात सहभागी होता येईल. आतापर्यंत असे सप्ताह आम्ही काशी व पिठापूर येथे चालविले. तुम्हाला माहित आहेच कि असाच एक सप्ताह करून आम्ही नुकतेच रामेश्वरमहून परत आलो आहोत. आणि अर्थातच अशा प्रकारचा सप्ताह आम्ही वाडीला बऱ्याच वर्षापासून करतो आहोत.

हा प्रचार अगदी प.पू. गुळवणी महाराजांनी दिलेल्या संदेशाशी सुसंगत असाच आहे. १९५७ साली महाराजांनी केवळ एकच सार्वजनिक भाषण

दिले, त्यावेळेस त्यांनी विनंती केली कि जर आपल्या देशाची व अवघ्या जगाची उन्नती व्हावयाची असेल तर प्रत्यकाने महायोगाची साधना केली पाहिजे. महायोगाची शिकवण व साधनेचा जिथे जाल तिथे प्रचार करावा, असा आशीर्वाद प.पू. स्वामी नारायण तीर्थ देव महाराज यांनी प.पू. लोकनाथ तीर्थ स्वामी महाराज यांना  दिला होता, त्यांसही हे अनुसरून आहे. तुम्हाला ज्ञात असेलच की प.पू. स्वामी नारायण तीर्थ देव महाराज हे प.पू. लोकनाथ तीर्थ स्वामी महाराजांच्या गुरूंचे गुरू होते. तेच महायोगाच्या गुरूपरंपरेतील मूळ गुरू होते आणि त्यांनीच आधुनिक काळात, १९व्या शतकाच्या शेवटी व २०व्या शतकाच्या सुरूवातीला महायोगाच्या प्रचारास सुरूवात केली. त्यामुळे मला असे वाटते की मी फक्त या प्रचार परंपरेचा भारवाहक आहे, जी प.पू. स्वामी नारायण तीर्थ देव महाराजांपासून प.पू. स्वामी लोकनाथ तीर्थ महाराजांकडे ,तिथून प.पू. गुळवणी महाराजांकडे व त्यांच्याकडून माझ्यापर्यंत आली आहे. मला असे कधी वाटलेच नव्हते कि महायोगाच्या प्रचारात मी इतका गुंतून जाईन. फक्त भारतातच नव्हे तर परदेशातसुध्दा मी इतका प्रवास करेन असा कधी विचारही केला नव्हता. महायोगाच्या प्रचारासाठी लंडनपर्यंत किंवा अमेरिकेतील काही मोठ्या शहरापर्यंत प्रवास करीन अशी मी कल्पनाही केली नव्हती. मध्यपूर्वेतील बहारीन व कुवैतला जाण्याचा तर विचार बाजूलाच ठेवूया.

संपादक - तुम्हाला या परदेशी स्थळांबद्दल काय वाटले?

गुरूदेव - मी खरे तर त्या साधकांचे आभार मानतो ज्यांनी त्या त्या जागी भेट देण्याची सर्व व्यवस्था केली, शिवाय तेथील साधकांना महायोगाबद्दल काहीतरी माहिती मिळण्याची संधी उपलब्ध करून दिली. तुम्हाला माहित आहेच की आम्ही महायोगाबद्द्ल फक्त बोललो नाही, तर जे हजर होते त्यांना महायोगातील ध्यानाचा अनुभव घेण्याची संधी मिळाली. याचे एक उदाहरण म्हणजे , ११ सप्टेंबर २००७ रोजी कॅलीफोर्निया येथे एका वैश्विक शांतीच्या समारंभात आम्ही भाग घेतला होता. मोठे भाषण देण्याइतका

वेळही आमच्याकडे नव्हता. त्यामुळे इतर वक्त्यांनी जशी भाषणे दिली तसे न करता, आम्ही उपस्थित असलेल्या सर्वांना महायोगाच्या ध्यानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यास मार्गदर्शन केले. सर्व उपस्थितांचा व आयोजकांचा फार मोठा प्रतिसाद मिळाला. आयोजकांनी तर आम्हाला कौतुकभरले पत्र पाठवले आणि नुसते भाषण देण्याऐवजी उपस्थित सभासदांना आंतरिक शांततेचा खरा अनुभव दिल्याबद्दल आमचे आभार मानले.

बहारीनमधील एका १५० वर्षांपूर्वीच्या कृष्णाच्या मंदिरात आम्हाला भाषण देण्यासाठी निमंत्रित केले होते. आयोजकांनी मला सांगितले की तिथे उपस्थित असलेले सर्वजण कृष्णाचे भक्त आहेत आणि भगवदगीतेचा अभ्यास करीत आहेत. मी जेव्हा श्रोत्यांसमोर बोलायला सुरूवात केली तेव्हा मी म्हणालो, “तुम्हा सर्वांना गीता कशी पाठ करावी हे माहीत आहेच परंतु मी आज तुम्हाला गीतेतील शिकवण आचरणात कशी आणावी हे सांगणार आहे.” असे प्रास्ताविक केल्यानंतर मी त्यांचे लक्ष गीतेच्या सहाव्या अध्यायाकडे वेधले ज्यात महायोगाचा मतितार्थ सांगितला आहे. तेथे हजर असलेल्या १५० ते २०० श्रोतृवर्गाला मी डोळे बंद करण्यास सांगितले आणि दहा मिनिटे महायोग ध्यान करण्यासाठी मार्गदर्शन केले. आम्हाला दिसले की इतर ठिकाणी जशा प्रकारे ध्यानाचा अनुभव घेताना श्रोते पूर्णपणे तल्लीन होतात, तसाच परिणाम या ठिकाणीही दिसून आला. मी त्यांना फक्त सूचना दिल्या होत्या की, शरीर सैल सोडा, सहज येणाऱ्या /जाणाऱ्या श्वासाचा वेध घ्या आणि काय होते आहे ते पहा. या प्रकारे श्रोतृवर्गाचे चित्त श्वासावर खिळून राहिले, श्वास जो प्राणशक्तीचे किंवा आदिशक्तीचे प्राकृतिक स्वरूप आहे आणि या प्रक्रियेत ज्या प्राणशक्तीवर आपले शरीर व मन निर्भर असते त्या प्राणशक्तीचा त्यांना प्रत्यक्ष अनुभव आला. यातून असे दिसते की महायोग हा सर्वात सोपा, खर्च नसलेला व मनुष्यजातीसाठी सर्वात उच्च प्रतीचा असा योगमार्ग आहे. त्यामुळे मला असे वाटते की जिथे जिथे आम्ही प्रवास केला, तिथे तिथे हे महायोगाचे बीज पेरले गेले आहे. माझी खात्री आहे की जे लोक हजर होते व ज्यांनी

महायोग ध्यानाचा अनुभव घेतला, त्यांना एक दिवस याचे फळ नक्कीच मिळेल.

संपादक - फारच छान! परंतु आता साधकांच्या सर्वसाधारण प्रश्नांबाबत आपण बोलावे असे मला वाटते. तर रोजच्या व्यग्रतेत, कौटुंबिक जबाबदारीसह महायोगाच्या साधनेचा समावेश आपल्या आयुष्यात कसा करावा, इत्यादी. महाराष्ट्र राज्याचा एक सुपरींटेंडिंग सिव्हील इंजिनियर म्हणून तुमची कारकीर्द यशस्वी झाली. महायोगाचा साधक म्हणून साधनेला अग्रक्रम देताना तुमच्या नोकरीतील  महत्वाच्या व आवडीच्या कामाला तुम्ही कसे प्राधान्य दिले?

गुरूदेव - माझ्यासाठी नेहमीच महायोग साधनेला अग्रक्रम होता आणि व्यवसायक्षेत्राचे स्थान दुय्यम होते. याचा अर्थ असा नाही की मी माझ्या व्यवसायाकडे दुर्लक्ष केले. माझी महायोगासाठी जरूर असलेली साधना मी नेहमीच करीत राहिलो पण त्यासाठी मला माझ्या व्यवसायाशी काहीही तडजोड करावी लागली नाही. मी त्यासंदर्भात काही उदाहरणे देतो. नोकरीनिमित्त मला नेहमी महाराष्ट्रातील अनेक गावांना भेट द्यावी लागत असे. काही वेळा नवी दिल्लीला विमानाने प्रवास करावा लागत असे. बऱ्याच वेळा विमानात माझ्या बाजूच्या सीटवर कंपन्यांचे अधिकारी बसलेले असत. जेव्हा आम्ही बोलायला सुरूवात करत असू तेव्हा त्यांना फार आश्चर्य वाटे की माझ्यासारखा धोतर, कोट, टोपी घातलेला देशी पोषाखातील माणूस महाराष्ट्र राज्याचा एक सिव्हील इंजिनियर आहे आणि फक्त हेच नाही तर मी पाणी व जलविज्ञानासंदर्भात सिव्हील इंजिनियरिंगच्या ५३ वेगवेगळ्या प्रश्नांवर संशोधन करीत आहे, याचेही त्यांना नवल वाटे. वस्तुत: पाण्याच्या धरणांना ज्या भेगा पडतात, त्यासाठी लागणाऱ्या व परदेशातून मागविण्यात येणाऱ्या ग्राऊटऐवजी  मी एक खास प्रकारचा, कमी किंमतीचा ग्राऊट (सांध्यांमधला चुना) तयार केला होता. या माझ्या कामाबद्दल व तत्सम अनेक मोठ्या समस्या सोडविल्याबद्दल महाराष्ट्र राज्यसरकारकडून मला कौतुकाचे / अभिस्वीकृतीचे प्रमाणपत्र

प्रदान करण्यात आले आहे. कोणालाही काही वाटत असले तरी, माझ्या साधक म्हणून जगण्याच्या आवश्यकतेत मी कधीही माझा व्यवसाय आड येऊ दिला नाही.

संशोधन करण्याची मला आवड असल्यामुळे, जरी बऱ्याच वर्षांपूर्वी म्हणजे १९५२ साली मी बी ई.ची पदवी घेतली होती, तरी १९६२ साली शासनाने मला सिव्हील इंजिनियरिंगमध्ये मास्टर्सची पदवी घेण्यास सांगितले. मी पुन्हा कॉलेजमध्ये जाऊ लागलो. पण या वेळेस मी कलकत्ता युनिव्हर्सिटीत 'पब्लिक हेल्थ' या विषयात मास्टर ऑफ इंजिनियरिंगसाठी प्रवेश घेतला. तर १९६२-६३ मध्ये दोन वर्षे मी कलकत्त्यात होतो. तेथे वसतिगृहात राहात असताना माझ्या लक्षात आले की जर मी वसतिगृहातील खानावळीत जेवलो तर मला माझे आहारावरचे निर्बंध पाळता येणार नाहीत. म्हणून मी माझ्याकरिता वेगळी भोजनाची व्यवस्था करण्याची परवानगी मागितली. परंतु वरिष्ठांनी मला तशी परवानगी देणे नाकारले. त्यामुळे वसतिगृहात न जेवता फक्त तेथील हजेरीबुकात नोंद करून मी केळी किंवा काही फळे खात असे आणि मग माझे मुख्य जेवण जेवण्यास वसतीगृहाच्या बाहेर जात असे, जिथे मी माझे जेवण बनविण्याची व्यवस्था केली होती आणि त्यामुळे माझे आहारावरील निर्बंध पाळणे मला शक्य होई. या सर्व वर्षात, आयुष्यात कोणतीही परिस्थिती असली तरी मी दक्षतेने /कसूर न करता रोज साधन करीत असे. तेव्हा महायोगाला माझ्या आयुष्यात सर्वात अधिक प्राधान्य आहे. आणि साधक म्हणून मला ज्यास अग्रक्रम द्यायचा होता, त्यासाठी मला नेहमीच मार्ग सापडत असे. व्यवसायिक गुंतवणुकीचा कोणताही परिणाम होत नसे. महायोगाच्या साधनेबद्दल मला नेहमीच ममत्व वाटते. या मार्गावर प्रगती करायची असेल, तर साधन हीच गुरुकिल्ली आहे. साधकाने रोजच साधना केली पाहिजे. या मार्गावर जेव्हा साधकाचे साधन आपोआप होते तेव्हा ते शब्दांच्या पलीकडचे असते.

संपादक - साधन आणि महायोग याबद्दल आणखी काही सांगावे. मला खात्री आहे की तुमचे म्हणणे काय आहे हे ऐकण्यासाठी साधक जास्त उत्सुक असतील.

गुरुदेव - ठीक आहे. तुम्हाला हे सर्व माहीत आहेच. पण महायोगाबद्द्लचे माझे विचार लिखित स्वरुपात ठेवण्याची तुमची उत्सुकता पाहता मी प्रथम महायोगाबद्द्ल थोडेसे बोलतो. तुम्ही जाणताच की, आपले शरीर शाश्वत नाही आणि मनही शाश्वत नाही. परंतु आपल्या सर्वांच्या आत जी प्राणशक्ती (आदिशक्ती) आहे, ती शाश्वत आहे. काही वर्षापूर्वी आलेल्या त्सुनामीत लाखो लोकांचा विनाश झाला, परंतु प्राणशक्ती कोठेही गेली नाही, ती कायम राहते.

महायोग हा आपल्या जाणिवा प्राणशक्तीशी जोडण्याचा सरळ मार्ग आहे. आपले शरीर जिवंत राहते कारण त्यात प्राणशक्ती निवास करीत असते. तुम्ही हे जाणता की मन हे शरीरापेक्षा जास्त महत्वाचे आहे. परंतु मन हे जरी सूक्ष्म असले तरी तेही शाश्वत नाही. त्याला स्थिरताही नसते. काही वेळा आपले विचार अगदी उच्च प्रतीचे असतात पण काही वेळा ते फारच हलक्या प्रतीचे असतात. म्हणून मन हे आपण आदर्श मानू नये. तर मग मन हे काय आहे? मन हे दुसरे काहीही नसून फक्त विचारांची मालिका आहे. दोन विचारांमध्ये कधीकधी अंतर असू शकते. पण अशा मध्यंतरातसुद्धा आपण जिवंत असतो, लगेच काही मरत नाही. या दोन विचारांच्या मध्यंतरात मनाचे काही चलनवलन नसते, तेव्हा आपल्याला जिवंत ठेवणारे काय असते? आपल्या आतील प्राणशक्तीचे अस्तित्वच आपल्याला जिवंत व कार्यक्षम ठेवते. आपल्या अस्तित्वाचा कायमचा व शाश्वत हिस्सा असलेल्या या प्राणशक्तीशी संपर्क जोडण्यास महायोग मदत करते.

जेव्हा आपण शरीर शिथिल करून श्रद्धा व भक्तीसह डोळे बंद करून बसतो तेव्हा शक्तीचा एक सूक्ष्म प्रवाह आपल्या पाठीच्या कण्यातून वरवर जातो आणि मेंदूत जाऊन वास्तव्य करतो. असे घडते तेव्हा एक क्षणभर

आपण दोन विचारांमधला मध्यंतर अनुभवतो. अशा गोष्टीला आम्ही म्हणतो " न-मन" किंवा "न:मन" (मन नसणे). जेव्हा आपले मन कार्यरत असते तेव्हा  आपल्या सगळ्या जाणिवा जागृत असतात. जेव्हा आपले मन स्तब्ध असते तेव्हा एक क्षणासाठी आपल्याला  संवेदनाची जाणिव राहात नाही. दोन विचारांच्या मध्यंतरातला काळ अनुभवणे हीच महायोगाची गुरुकिल्ली आहे. आमच्या भाषणाबरोबरचे प्रात्यक्षिक तुम्ही पहिले आहे, तेव्हा  ह्याचा सराव कोणीही घरी करू शकतो.

लोक नेहमी विचारतात, "आपण सर्व या जगात कसे आलो?" अर्थात आपल्या पालकांची तशी इच्छा होती म्हणून आपल्यापैकी प्रत्येकजण या पृथीवर जन्मास आला आहे. त्यांच्या तशा इच्छा (वासना) फलित झाल्या नसत्या तर आपल्यापैकी कोणीही जन्मास आले नसते. या वासना किंवा इच्छा आपल्याला फक्त अस्तित्वात आणत नाहीत तर त्यांच्यामुळे आपण सतत जन्म मृत्युच्या फेऱ्यात अडकून राहतो / फिरत राहतो. ही संकल्पना समजून घेणे फार महत्वाचे आहे, की केवळ वासनाच आपल्याला या अशाश्वत जगात आणतात. महायोगाचे हे उद्दिष्ट आहे की, आपल्या वासनांचे परिणाम नामशेष करून आपल्याला या जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटका मिळावी. साधकासाठी नियमित साधन हेच कार्य करेल.

महायोगाच्या संदर्भात एक महत्वाची गोष्ट म्हणजे साधकाने साधन करायचे नसते. साधकाने शरीराच्या संवेदनांचा निरास व्हावा म्हणून फक्त शरीर शिथिल करून बसायचे. साधकाने स्वत:चे मन कशावरही एकाग्र करण्यासाठी वापरायचे नाही, कारण मन सर्व गोष्टींपासून पृथक करणे हे आपले उद्दिष्ट आहे. साधकाचे मन हे साधन करीत नसते तर अंतस्थ प्राणशक्ती साधन करीत असते. तेव्हा साधकाने केवळ शिथिल अवस्थेत बसायचे, शरीरावरचा व मनावरचा जाणीवपूर्वक ताबा सोडून द्यायचा आणि प्राणशक्तीला तिचे कार्य करू द्यायचे. साधकाने फक्त आपल्या श्वासाचे निरीक्षण करायचे आणि काही विचार मनात आल्यास त्यात गुंतायचे नाही, अर्थात त्याने प्राणशक्ती ज्यातून प्रकट होते त्या श्वासाचे निरीक्षण

करण्याची भूमिका वठवायची आहे. स्वत:ला समर्पित करा, म्हणजे हे शरीर व मन दोन्ही प्राणशक्तीकडे सुपूर्द करा आणि तिला साधन करू द्या.

संपादक - महायोग व साधन याचा उत्कृष्ट सारांश दिल्याबद्दल धन्यवाद. मला खात्री आहे की तुम्ही सादर केलेले हे महत्वपूर्ण मुद्दे साधकांना नक्कीच मोलाचे वाटतील. आपल्या वाचकांसाठी व इतरांसाठी आणखी काही गोष्टींबद्दल तुमचे विचार जाणून घ्यायचे आहेत. पहिला प्रश्न असा की, जे दीक्षा मागण्यासाठी येतात ते सर्व दीक्षा घेण्यास पात्र आहेत असा विचार तुम्ही करता, की दीक्षा देण्याचे वा न देण्याचे तुमचे काही निकष आहेत.

गुरूदेव - नाही, मी तसे काही निकष बाळगत नाही. जर एखाद्या व्यक्तीला दीक्षा घेण्याची इच्छा असली तर तो/ ती दीक्षा घेण्यास योग्य आहे असेच मी मानतो. उदाहरणार्थ, बाजारात अनेक दुकाने असतात. एखाद्याला विशिष्ट प्रकारचे उत्पादन विकत घ्यायचे असेल तर तो त्याच दुकानात जाईल, जिथे ते विकले जाते. बाजारातील प्रत्येकजण त्या विशिष्ट दुकानात जाणार नाही. त्या दुकानात विकल्या जाणाऱ्या वस्तूंबद्दल ज्यांना आकर्षण आहे, तेच त्या दुकानात जाऊन पाहतील. तेव्हा माझा दृष्टीकोन असा आहे की ज्याची दीक्षा घ्यायची इच्छा आहे, त्याला तशी इच्छा होण्यासही काहीतरी आधार/कारण असेल, म्हणूनच तो दीक्षा घेऊ शकतो. या आयुष्यातील किंवा पूर्वायुष्यातील आपल्या मनावर बिंबलेले संस्कार अशा इच्छा तयार होण्यास कारणीभूत आहेत. म्हणून जेव्हा एखादी व्यक्ती दीक्षा घेण्याची इच्छा व्यक्त करते, तेव्हा मला असा संकेत मिळतो की या व्यक्तीने महायोगाबद्द्ल आस्था दाखवली कारण त्याचे काही पूर्वसंस्कार असावेत आणि त्यामुळेच तो दीक्षा घेण्यास लायक आहे.

एखादा मित्रांचा ग्रुप असेल आणि आता संध्याकाळ कशी व्यतीत करावी याबद्दल ते विचार करत असतील. त्यातील काही जणांना एखाद्या

सिनेमाला जावेसे वाटते, तर काहींना दुसऱ्या सिनेमाला जावेसे वाटते. पण त्यांच्यातल्या एकाला वाटते की एका आध्यात्मिक विषयावरच्या व्याख्यानाला जावे. असे का घडते? त्या व्यक्तीच्या आत जे काही आहे ते त्याला सिनेमाकडे न नेता, आध्यात्मिक भाषणाकडे आकर्षित करते आहे. आपल्याला माहित नाही की नक्की काय आहे, जे त्याच्या मित्रांना सिनेमाला जायचे असले तरीही, त्याला आध्यत्मिक भाषणाला हजर राहावयास सांगते आहे. माझा विश्वास आहे की साधन आणि त्याचे पुर्वजन्मापासूनचे संचित संस्कार यामुळेच तो प्रथमत: आध्यात्मिकतेकडे ओढला जातो. सरतेशेवटी नियमित साधन केल्याने गतजन्मीचे व याजन्मीचे संस्कार नष्ट होतात आणि इच्छाविरहित अवस्था प्राप्त होते, ज्यात त्याच्या ऐहिक व पारमार्थिक सगळ्या इच्छा नाहीशा होतात, पुनर्जन्माची आवश्यकता राहात नाही आणि महायोगाच्या अंतिम ध्येयाकडे त्याचा प्रवास सुरु होतो.

मला भेटायला आलेल्या एका माणसाचे उदाहरण मी तुम्हाला सांगतो. तो मला म्हणाला, “प्रत्येकानेच योग अनुसरला पाहिजे, अशी तुमची इच्छा का आहे? मी सर्व प्रकारची वाईट कृत्ये केली आहेत आणि वेगवेगळ्या प्रकारची पापेही केली आहेत. माझ्यासारख्या माणसाला तुम्ही योगमार्ग अनुसरायला कशाला सांगाल?” मी त्याला म्हणालो, “तुझी दुष्कृत्ये किंवा पापे यांच्याशी माझा काही संबंध नाही, तसेच तू काही चांगली कृत्ये केली असतील तर त्यांच्याशीही माझा संबंध नाही. तुला जर योगात रुची असली तर मला तुझ्याशी बोलायला आवडेल. ते नको असेल, तरीही चालेल. आता तू जाऊ शकतोस.” तो म्हणाला, “मला यावर विचार केला पाहिजे.” त्याचा तो ‘विचार केला पाहिजे’ हा शेरा ऐकला तेव्हाच मला जाणवले की हा अगोदरच मार्गावर आहे. यातून असे दिसले की त्याचा दुष्टपणा गौण होता आणि अध्यात्मासाठीची तळमळ विकसित होत होती. हे असे आहे याची त्याला कल्पनाच नव्हती; पण माझ्यासाठी तो योगी बनण्याच्या मार्गावर चालू लागला होता. पहिले म्हणजे तो

स्वत:च्या इच्छेने मला भेटायला आला होता. कोणी त्याला जबरदस्तीने पाठवले नव्हते. या दिशेने वळण्याचे कारण तो स्वत:च होता. त्याची अभिलाषा त्याला प्रेरित करीत होती. या पृथ्वीतलावर अशी अभिलाषा प्रत्येकाच्या मनात असावी असे आम्हाला वाटते!

संपादक - फारच उत्कृष्ट! पण त्या साधकांचे काय जे दीक्षा मागतात, ती त्यांना मिळतेही. परंतु ते साधन करण्यासाठी बसत नाहीत?

गुरूदेव - त्याने काही फरक पडत नाही! एकदा का प्राणशक्ती जागृत झाली की साधकाचे सर्व पूर्वसंस्कार आणि वासना यातून त्याला अखेरीस शुध्द केल्याशिवाय ती स्वस्थ बसत नाही. एक असाच साधक होता. खूप वर्षांपूर्वी त्याला दीक्षा मिळाली होती आणि त्यावेळेस साधनेत त्याला चांगले अनुभव आले होते. अर्थात पुढे जसा तो मोठा झाला, त्याचे लग्न झाले आणि दररोजच्या धकाधकीच्या जीवनात त्याने साधन करणे सोडून दिले. एक दिवस त्याला आठवले की, काही वर्षांपूर्वी तो मला भेटायला आला होता व त्याला दीक्षा मिळाली होती. तात्काळ त्याला काही कळण्याआधीच साधन सुरु झाले आणि क्रिया होऊ लागल्या. (क्रिया = प्राणशक्तीमुळे घडून येणाऱ्या, आपोआप होणाऱ्या हालचाली व कृती) म्हणजे, जागृत झालेली प्राणशक्ती साधकाला सर्व वासनांपासून शुध्द केल्याशिवाय सोडणार नाही. या जन्मी जमले नाही तर पुढल्या जन्मी. म्हणूनच आपण जो पूर्वाभ्यासाचा मसुदा (या मार्गाचे प्रास्ताविक) तयार केला आहे, त्याला फार महत्व आहे. महायोगाचे फायदे मिळावेत म्हणून या पूर्वाभ्यासात ज्यांनी भाग घेतला आहे त्यांना सरतेशेवटी ते मिळतीलच. अर्थात याला वेळ लागेल. ते एका रात्रीत होणार नाही पण होईल हे निश्चित. एकदा प्राणशक्ती जागृत झाली की साधक जरी साधनेला बसला नाही तरी जी शक्ती त्याच्या आत कार्यरत झाली आहे, ती साधन करत राहील. साधकाने साधन करून प्राणशक्तीला स्वत:ला शुद्ध करण्याचे कार्य करू दिले तर त्याची प्रगती लवकर होईल. परंतु काहीही झाले तरी अखेरीस प्रत्येक साधक त्याच्या सर्व वासनांपासून मुक्त केला जाईल.

संपादक - ही साधकांसाठी खरोखरच चांगली बातमी आहे. मला खात्री आहे की ही बातमी साधकांना नियमितपणे साधनेला बसण्यासाठी उद्युक्त करेल. गुरुने शिष्याला दीक्षा देण्याची जी प्रक्रिया आहे त्याविषयी मला काही प्रश्न विचारायचे आहेत. पहिला प्रश्न असा की, एखाद्या व्यक्तीला जेव्हा गुरू दीक्षा देतात तेव्हा नेमके काय करतात? आणि दुसरा असा की, वर्षातून फक्त दोनदाच का दीक्षा दिली जाते?

गुरूदेव - दीक्षा देण्याचा आमचा दृष्टीकोन अगदी साधा आहे. आम्ही संकल्प दीक्षा देतो म्हणजे, आम्ही इच्छा करतो की, ज्यांना दीक्षा घेण्याची इच्छा आहे त्यांना ती प्राप्त होवो. काही गुरू दृष्टीने दीक्षा देतात म्हणजे केवळ दिक्षार्थीयाकडे नजर टाकून दीक्षा प्रदान करतात. इतर काही मंत्रदीक्षा देतात. तर काही जण स्पर्श करून दीक्षा देतात. तथापि या सर्व वेगवेगळ्या पध्दती वापरताना गुरूने संकल्प करायला हवा किंवा गुरूची तशी इच्छा असायला हवी की दिक्षार्थीयाला दीक्षेचा लाभ होवो. तेव्हा फक्त नजर वा मंत्र वा स्पर्श हे नव्हे तर गुरूचा संकल्प हाच प्रमुख घटक आहे.

तसे वर्षातून दोन वेळाच दीक्षा देणे हे काही विशेष तर्कसंगत नाही, पण त्यामागे काही एक विचार आहे. आम्ही वर्षातील दोन शुभ दिवस/ वेळ पाहतो, ज्यात साधारण सहा महिन्यांचे समान अंतर असावे. त्यामुळे काय होते तर काही माणसांना दीक्षा मिळण्याकरिता थांबावे लागते, कधीकधी काही महिने वाट पहावी लागते. पण त्या काळात ते पूर्वाभ्यासाचा सराव करू शकतात. या प्रतीक्षेमुळे त्यांना दीक्षा घेतल्यानंतर येणाऱ्या बांधिलकीचा/ निष्ठेचा सविस्तर विचार करण्यास संधी मिळते. जे निर्बंध आम्ही त्यांना पाळावयास सांगतो ते पाळण्याची त्यांची इच्छा आहे की नाही याविषयी ते चिंतन करू शकतात. मग ते निर्बंध स्वीकारून दीक्षा घेण्याची तयारी करावी, अन्यथा केवळ पूर्वाभ्यासाचा सराव चालू ठेवावा. मधल्या काळात त्यांच्या मनाची तयारी होऊ शकते. शेवटी जेव्हा दीक्षेचा लाभ होतो, तेव्हा काही जणांना चित्तवेधक अनुभव येतात, काहींना येत नाहीत. पण ते ठीक आहे. दीक्षा शेवटी प्रत्येक साधकाला त्याच्या

प्रगतीकरिता आवश्यक असलेल्या सगळ्या अनुपमेय अनुभवांपर्यंत आणि क्रियांपर्यंत घेऊन जाईल. गुरुतत्व कायम त्याच्याबरोबर असेल आणि त्याच्या साधनात व आध्यात्मिक प्रवासात त्याला मार्गदर्शन करेल.

संपादक - गुरूदेव, इतक्या विलक्षण सुंदर चर्चेसाठी धन्यवाद. जाता जाता तुम्हाला काही सांगायचे आहे का?

गुरूदेव - महायोगाचा दृष्टीकोन किती साधा व उपयोगाचा आहे यावर मला जास्त भर द्यायचा आहे. लोकांचे वेगवेगळया प्रकारचे धर्म आहेत. महायोग हा सर्व धर्म व पंथ यांच्या पलीकडे आहे. महायोग आपल्या दृढ विश्वासावर आधारित आहे की, प्राणशक्ती, जिची प्राकृतिक प्रतिनिधित्व असलेली हवा, त्या हवेत आपण श्वास घेतो, तीच आपल्या सर्वांना आधार देणारी आदिशक्ती आहे. ज्या हवेत आपण भारतदेशात श्वास घेतो, त्याच हवेत अमेरिकेतील माणसे श्वास घेतात, सर्व जगातही तेच आहे. अगदी तसेच प्राणशक्तीचे आहे, आपल्या सर्वांना आधार देणाऱ्या आदिशक्तीचे आहे. तेव्हा आपल्या सर्वांची आई एकच आहे आणि आपण सर्व एकमेकांचे भाऊ-बहिणी आहोत. आपली एकमेकांशी भांडणे होतात, पण आपण सर्वांनी लक्षात हे घेतले पाहिजे की आपण सर्व एकाच आईची मुले आहोत. ती कायम आपल्या बरोबर असते. आता हे अनुभवण्यास सुरूवात करा आणि स्वत:ला तसे पाहावयाचा प्रयत्न करा, मग हे जग अतिशय सुंदर असेल. हाच माझा ध्यास आहे.

(मूळ इंग्रजी चर्चेचा मराठी अनुवाद - सौ. सीमा पितळे)